**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः चंद्रकांत सखाराम काणेकर,

वयः ७५ वर्षे, व्यवसायः निरंक,

राहणारः देवकान्हे, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांचे मार्फत सुरु.**

०१. दि.१७/१२/२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही आहे. परंतू त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/१२/२०२३ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच सुरेश पांडुरंग जांभुळघरे याला मौजे सांगळे येथील आरोपीचे घराचे मागे बेडयामध्ये पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते, त्या ठिकाणी पोलीसांना आरोपीचे ताब्यातील रबरी ट्यूबमध्ये ४० लि. गावठी हातभट्टीची दारू मिळाली होती, सदर मुद्देमालापैकी प्रत्येकी १८० मि.लि. दारू दोन काचेच्या स्वच्छ बॉटलमध्ये सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद करण्यता आली, त्याचा पोलीसांनी माझेसमक्ष पंचनामा तयार केला, त्यावर मी वाचून सही केली.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ओळखतो, तो माझे गावातील रहिवासी आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.पी. दांडेकर यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.02.11 14:53:49 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.११.०२.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.